## भारतीय पट्टेरी वाघांची वस्तुस्थिती

लांबी: २.५-३ मीटर

वजन: १२५-२५० किलो

संख्या: ११६५-१६५७* (सरासरी १४११)

आयुष्यमान (नैसर्गिक वातावरणात): अंदाजे १० ते १६ वर्षे

मुख्य अन्न: चितळ, सांबर, रानडुक्कर, गवा

प्रजननाचे किमान वय: ३ ते ४ वर्षे (मादी) ४ ते ५ (नर)

गर्भधारणेचा कालावधी: १०५ ते ११२ दिवस

दर्जा: नामशेष होण्याच्या मार्गावर

महत्व: जगभरातील जंगलांमध्ये सापडणाऱ्या एकूण वाघांपैकी जवळपास निम्मे वाघ भारतीय जंगलांत सापडतात.



* WII आणि NTCA, भारत सरकार यांनी २००८ साली केलेल्या सर्वेक्षण पद्धतीनुसार

छायाचित्र सौजन्य: समीर सिन्हा IFS/TRAFFIC-India, संतोष साळीग्राम, अमीन अहमद/डब्ल्यूडब्ल्यूएफ – इंडिया, NBL/डब्ल्यूडब्ल्यूएफ – इंडिया, दिवाकर शर्मा/डब्ल्यूडब्ल्यूएफ – इंडिया, जोसेफ वट्टकावेन /डब्ल्यूडब्ल्यूएफ – इंडिया

पृष्ठ रचना: अनिल चेरूकुपल्ली

अनुवाद: गौरी व. गुरव

एकत्रीकरण व संकलन: स्पिसिज् व लॅंडस्केप प्रोग्राम

प्रकाशन वर्ष: मे २०१०

## आम्ही कार्यरत असणारी ठिकाणे



खालील नमुद प्रदेशांमध्ये व व्याघ्र प्रकल्पामध्ये डब्ल्यूडब्ल्यूएफ – इंडिया कार्यरत आहे:

भूप्रदेश:

१. तराई वृत्तांश प्रदेश (उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार)
२. सातपुडा मैकल प्रदेश (मध्य प्रदेश, छत्तिसगढ, महाराष्ट्र)
३. पश्चिम घाट निलगिरी प्रदेश (केरळ, तामिळनाडू, कर्नाटक)
४. सुंदरबन (पश्चिम बंगाल)
५. उत्तर तीराकडील प्रदेश (आसाम, अरूणाचल प्रदेश)
६. काझीरंगा कार्बी ॲनलॉग प्रदेश (आसाम, मेघालय, नागालॅंड)

वाघांसाठी आरक्षित वने:

७. रणथंबोर (राजस्थान)
८. सिम्प्लिपाल आणि सात्कोसिया (ओरिसा)
९. बक्सा (पश्चिम बंगाल)
१०. पन्ना (मध्य प्रदेश)

WWF

*for a living planet®*

# वाघांचे संरक्षण

## आव्हाने, प्रतिसाद आणि तुम्ही काय करू शकता



WWF-India
Species & Landscapes
172 – B, Lodi Estate
New Delhi - 110003
Tel: +91 11 4150 4783
www.wwfindia.org

*WWF-India stands for World Wide Fund for Nature - India*

# आव्हाने



अधिकृत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतामध्ये हजारो वाघ शिल्लक होते. २००८ साली झालेल्या ‘कॅमेरा ट्रॅप’ सर्वेक्षणानुसार भारतातील वाघांची संख्या अंदाजे १४११* एवढीच शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. ही संख्या एवढी तुटपुंजी आहे की जर वेळ निघून  जाण्यापूर्वी आपण जागे झालो नाही तर वाघाची प्रजात समूळ नष्ट होऊन जाईल.

<u>नष्ट होत चाललेले अधिवास:</u> जंगलांमधून दळणवळणाचे रस्ते बांधणे, खाणकामांसारखे उद्योग चालवणे तसेच नैसर्गिक स्त्रोतांचा अनिर्बंध वापर ह्या आणि अशा इतर बऱ्याच कारणांमुळे वाघांचा अधिवास (जंगले) नष्ट पावत चालला आहे तर बऱ्याच ठिकाणी तो तुकडया तुकडयांमध्ये शिल्लक राहीला आहे. या सर्व गोष्टींना गेल्या काही दशकांपासूनच सुरूवात झाली आहे व त्याचा विपरित परिणाम अप्रत्यक्षपणे वाघांच्या संख्येवर होतो आहे.

<u>अवैध शिकार:</u>  वाघांना संरक्षित प्राणी घोषीत केले असून वाघांचे अवयव तसेच त्यापासून बनलेल्या वस्तूंचा व्यापार करणे हा कायद्याने गुन्हा आहे. तरीही केवळ ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी वाघाचे अवयव, त्याचे कातडे याचा अवैध व्यापार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरूच आहे व हाच व्यापार वाघांच्या अस्तित्वाला थेट धोका पोहोचवतो.

<u>मानवाविरूद्धचे द्वंद्व:</u> वाघांचे मानवाविरूद्धचे द्वंद्व वाढण्यास महत्वाचे कारण म्हणजे सातत्याने लोप पावत जाणारे त्यांचे अधिवास आणि त्यांचे भक्ष्य होय. ज्यावेळेस वाघांचे जंगलातील अन्न कमी होते त्यावेळेस नाईलाजने त्यांना जंगलालगतच्या भागांमध्ये प्रवेश करावा लागतो आणि निव्वळ त्यांच्या मुळ अन्ना आभावी ते गाई गुरांची शिकार करतात. यामुळे गावकरी बऱ्याचदा त्यांना मारून टाकतात.

*WII आणि NTCA, भारत सरकार यांनी २००८ साली केलेल्या सर्वेक्षण पद्धतीनुसार

# प्रतिसाद

१९७३ साली भारत सरकारने  डब्ल्यू डब्ल्यू एफ च्या सहकार्याने व्याघ्र प्रकल्पाची सुरूवात केली.  तेव्हापासून डब्ल्यू डब्ल्यू एफ सरकारच्या या प्रक्लपास सहकार्य करत आहे.

डब्ल्यू डब्ल्यू एफ – इंडियाचे उद्दीष्ट वाघांच्या अधिवासांचे पुनःस्थापन करणे व त्याची देखरेख करण्यास मदत करणे हे आहे. वाघांचे अस्तित्व जंगलांमध्ये वर्षानुवर्षे अबाधित रहाण्यासाठी जे सहा महत्वाचे भू प्रदेश आणि वाघांसाठी आरक्षित वनक्षेत्रे आहेत त्यांच्यावर डब्ल्यू डब्ल्यू एफ – इंडियाने आपले लक्ष केंद्रित केले आहे. डब्ल्यू डब्ल्यू एफ – इंडिया आणि सहकारी खाली नमुद केल्याप्रमाणे कार्यरत आहेत:

- वाघांचे मुख्य अधिवास व त्यांना जोडणाऱ्या अनेक छोटयामोठया वनांना संरक्षण देणे व त्यांची देखरेख ठेवण्यास मदत करणे. काहीवेळेस वाघ आणि मानव यांमध्ये असलेला तणाव कमी करणे.
- तेथील स्थायिक समाजाला उपजीवीकेचे पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे व त्याद्वारे अधिवासांवर पडणारा मानवाचा ताण कमी करणे.
- वाघाची व इतर वन्यप्राण्यांची अवैध शिकार व व्यापार यांना आळा घालण्यासाठी वन विभाग व इतर सरकारी यंत्रणांची क्षमता वाढविणे.
- वाघ व त्यांच्या अधिवासांच्या संरक्षणासाठी राज्य व राष्ट्रीय स्तरांवर उपाय योजना आखण्यासाठी मदत करणे.
- वाघांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती वाढविणे व समाजातील सर्व स्तरांना या मोहीमेत सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.



# आपण काय करू शकता

वाघांना वाचविण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येक जण खालील प्रकारे मदत करू शकतो –

<u>अधिक जागरूक बनावे</u> – या विषयाशी निगडीत पुस्तके वाचा व संकेतस्थळांना भेट द्या. वनविभाग किंवा काही स्वयंसेवी संस्थांमधील तज्ञांची मते जाणून घ्या.

<u>इतरांमध्ये जाणीव निर्माण करा</u> – वाघांचे अस्तित्व धोक्यात आहे व त्यांना आपल्या मदतीची गरज आहे याची जाणीव इतरांना करून द्या.

<u>एक जबाबदार पर्यटक बना</u> – निसर्गामध्ये भ्रमंती करताना निसर्गा बद्दल आदराची भावना ठेवावी. निसर्ग भ्रमण हे निसर्गाचा मनमुराद आणि निखळ आनंद घेण्यासाठी करावे त्याला हानी पोहोचवण्यास अथवा प्रदूषित करण्यासाठी नाही. जंगलाचे काही सोपे नियम पाळा: जंगलामध्ये आग पेटवू नका, जंगलांमधून वाहने सावकाश व काळजीपूर्वक चालवा, कचरा इतरत्र फेकू नका.

<u>क्षेत्र भेट</u> – सध्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी अधिवासा जवळच्या समाजाला भेट देऊन त्यांची मते जाणून घ्यावीत. तसेच अशा समाजांबरोबर काम करणाऱ्या संस्थांना पाठींबा द्यावा.

<u>कायदेमंडळाशी पत्रव्यवहार करावा</u> – वाघांच्या संरक्षणात हातभार लावण्यासाठी आपल्या काही सुचना असल्यास त्याबद्दलचे निर्णय घेणाऱ्या व्यक्तींना जसे पंतप्रधान, वन व पर्यावरण मंत्री  किंवा स्थानिक कार्यकर्ते यांना विनयशील पद्धतीने त्या जरूर कळवाव्या.

<u>वन्य प्राण्यांची चोरटी शिकार आणि अवैध व्यापार यांना आळा घालण्यास मदत करावी</u> – वन्य प्राण्यांच्या शिकारीबद्दल अथवा व्यापाराबद्दल कुठल्याही प्रकारची माहीती तुम्ही TRAFFIC-India ला कळवू शकता. TRAFFIC ही संस्था वन्यप्राण्यांची होणारी अवैध शिकार व व्यापार थांबविण्यासाठी कार्यरत आहे. (संपर्क: trafficind@wwfindia.net, टेलीफोन: ०११ – ४१५४७८६, फॅक्स: ०११ – ४३५१६२००, वेबसाइट: www.traffic.org)

<u>नैसर्गिक साधनसंपत्तीवर पडणारा ताण कमी करावा</u> – नैसर्गिक साधनसंपत्तीचा कमी वापर, पुनर्वापर करावा. कागद, इमारती लाकूड इत्यादी वस्तूंचा काळजीपूर्वक वापर करावा.

<u>डब्ल्यू डब्ल्यू एफ ला सहकार्य करा</u> – पर्यावरण संरक्षणासाठी देणगी देऊन डब्ल्यू डब्ल्यू एफ – इंडिया व इतर पर्यावरण संस्थांना सहकार्य करावे.

<u>अधिक माहीतीसाठी संपर्क</u> –   www.wwfindia.org/tigers
www.projecttiger.nic.in